# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट :- ४२८/२०२३ दिनांक – १४/१२/२०२३

**रात्रौचेवेळी रिक्षामध्ये प्रवाशी म्हणून बसलेल्या प्रवाशांची लुटमार करणारे रिक्षाचालक चोरास अटक**
**काशीमीरा पोलीस ठाणेची कामगीरी**

फिर्यादी श्री. जिग्नेश आनंदभाई गोस्वामी वय-३५ वर्षे, धंदा-नोकरी रा-अहमदाबाद शहर, राज्य-गुजरात हे दि.०९/१२/२०२३ रोजी दुपारी-१२.०० वा.सुमारास मिरारोड येथे येवून काशिमिरा येथील हायवे लगतचे सरोजा लॉजिंग येथे थांबले होते. फियादी हे सायंकाळी- १८.३० वा.चे सुमारास त्याचे मित्रांसोबत जवळचे समुद्रा बार ॲण्ड रेस्टॉरंट येथे जेवणासाठी जावून रात्रौ २२.४५ वा. चे सुमारास सरोजा लॉजिंगकडे अजित पॅलेस हॉटेल जवळून पायी चालत जात असतांना पाठीमागून आलेल्या रिक्षास हात दाखवून सरोज लॉजींग येथे सोडण्यास सांगून प्रवाशी म्हणून रिक्षात बसले. फिर्यादी यांची रिक्षा सरोजा हॉटेलच्या समोर रोडवर असतांना रिक्षाचे पाठिमागून एका मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी रिक्षास मोटार सायकल आडवी लावून थांबवली. त्यानंतर रिक्षाचालक तसेच फिर्यादी यांना तुम्ही रिक्षामध्ये ड्रग्ज घेवून जात आहात असे बोलून जबरदस्तीने फिर्यादी यांचा अंगावरील सोन्याचे दागीने किंमत १,७५,०००/- खेचून चोरुन नेले मजकुरचे फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन गु.रजि.नं.८११/२०२३ भा.द.वि.सं.क. ३९२,३४ प्रमाणे दि.१०.१२.२०२३ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदरचा गुन्हा जबरी चोरी व गंभीर स्वरुपाचा असल्याने मा. वरिष्ठांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे तपास सुरु केला. फिर्यादी यांनी रिक्षातून प्रवास केलेली रिक्षा क्र. MH-04/JQ 8214 चे चालकाकडे तपास केला. घटनास्थळ, येणारा व जाणारा मार्ग आणि आजुबाजुचे सी.सी.टी.व्ही.कॅमेरांचे फुटेज तपासले असता नमुद गुन्हयात रिक्षाचालकाचा सहभाग असल्याचा संशय आल्याने त्यास विश्वासात घेवून सखोल तपास केला असता नमुद रिक्षाचालकाने व त्याचे दोन साथीदारांचे मदतीने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली.

गुन्हयाचे तपासात निष्पन्न आरोपी रिक्षाचालक प्रदिप दिलीप सवादकर वय-२९ वर्षे धंदा-रिक्षाचालक रा-रुम नं-२०१, हनुमान मंदिरच्या बाजुची बिल्डिंग, पेणकरपाडा, काशिमिरा, ठाणे त्याचे साथीदार १) जियाउल्ला ऊर्फ सोनु निजात खान वय-२६ वर्षे, धंदा- रिक्षाचालक रा- के.एन.शेख कंपाउंढ, मधुबन बिल्डिंगजवळ, केतकीपाडा, दहीसर-पुर्व, मुंबई, २) अरशद बासीद खान वय-३८ वर्षे, व्यवसाय-रिक्षाचालक रा-गणेश मंदिराजवळ, मिरागाव, मिरारोड-पुर्व, ठाणे यांचा अथक परिश्रमाने शोध घेवून वरील तिघांना दि.१०/१२/२०२३ रोजी अटक केली आहे. पोलीस कोठडी रिमांड मुदतीत आरोपीने चोरी केलेली मालमत्ता, गुन्हयात वापरलेली रिक्षा क्र. MH-04/JQ 8214 व मोटार सायकल MH-47/AF 7195 असा एकूण ३,१५,०००/- रुपये किंमतीची मालमत्ता हस्तगत केली आहे. अटक आरोपी हे सध्या न्यायालयीन कोठडीत असून नमुद गुन्हयाचा तपास मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पोउनि/शिवाजी खाडे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे-पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, श्री. महेश तरडे, सहा.पो.आयुक्त, मिरारोड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदिप कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलीस ठाणे, श्री.समीर शेख, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. योगेश काळे, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, सहा.फौ.अनिल पवार, पो.हवा. दिपक वारे, प्रताप पाचुंदे, राहुल सोनकांबळे, निलेश शिंदे, निकम, पो.अं. रवी कांबळे, प्रविण टोबरे, किरण विरकर, राजेंद्र सुर्यवंशी यांनी केलेली आहे.